साप्ताहिक
चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : ३
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com

चपराक प्रकाशन
www.chaprak.com

२५ व्या वर्षात पदार्पण
पुढील वर्धापनदिनापर्यंत
(१२ जानेवारी २०२७)
चपराक आणि लाडोबा प्रकाशनाच्या
सर्व पुस्तकांवर
२५ टक्के सवलत

ग्रंथसूची मागविण्यासाठी आमच्या ७०५७२९२०९२ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप करा.

वाचकांचे मनःपूर्वक आभार!

■ सोमवार, दि. २ ते ८ मार्च २०२६
संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले
RNI No. MAHMAR/2011/35979



नाशिक : 'चपराक प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या 'सर्जक' या पुस्तकास मिळालेला पुरस्कार स्वीकारताना लेखक मयूर बागुल.

## 'सर्जक'ला वसंतराव नाईक पुरस्कार प्रदान

**नाशिक :** येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनात स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार मयुर बाळकृष्ण बागुल यांनी लिहिलेल्या आणि 'चपराक प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या 'सर्जक' या पुस्तकाला प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत, गिरीश महाजन, पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ज्येष्ठ साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष सदानंद मोरे, मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

'सर्जक' हे पुस्तक शेती आणि शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या संकल्पनेवर आधारित असून, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पारंपरिक ज्ञान आणि पूरक व्यवसायांच्या संधी यांचा अभ्यासपूर्ण वेध घेते. त्यामुळे हे पुस्तक शेतकरी, ग्रामीण युवक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित वाचकांसाठी मार्गदर्शक ठरते. या पुस्तकासाठी प्रौढ वाङ्मय शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय या लेखन प्रकारात मयुर बागुल यांना वसंतराव नाईक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह आणि एक लाख रूपये असे त्याचे स्वरूप होते. 'चपराक प्रकाशन'ने हे पुस्तक प्रकाशित केले असून चपराकच्या संकेतस्थळावरून वाचक ते घरपोच मागवू शकतात.पुरस्कार स्वीकारताना मयुर बागुल यांनी मराठी भाषा विभाग प्रशासन तसेच निवड समितीचे आभार मानले. हा सन्मान 'चपराक प्रकाशन' आणि वाचकांच्या प्रेमामुळे मिळाल्याची भावना व्यक्त करतानाच या पुरस्कारामुळे आपली जबाबदारी अधिक वाढल्याचे मत त्यांनी मांडले. यावेळी त्यांच्या कुटुंबातील सदस्य देखील उपस्थित होते.

### महत्त्वाचे...



शिवसेनेची बुलंद तोफ असलेले खासदार संजय राऊत यांची 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील यांनी मुंबईतील 'सामना' कार्यालयात भेट घेतली. संजय राऊत यांची काही पुस्तके लवकरच 'चपराक प्रकाशन'तर्फे प्रकाशित होत आहेत.



महाराष्ट्राचे प्रयोगशील, कल्पक आणि कर्तबगार ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांची 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील आणि कार्यकारी संपादक प्रमोद येवले यांनी सदिच्छा भेट घेतली. गाडेकर यांनी त्यांच्या उपक्रमांची माहिती दिली. ग्रंथालये आणि वाचन उपक्रमांना बळकटी देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्नशील असून राज्यातील ग्रंथालय चळवळ आणखी सशक्त झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



मुंबई : 'लाडोबा' दिवाळी अंकाचा पुरस्कार उपमहापौर संजय घाडी यांच्या हस्ते स्वीकारताना संपादक घनश्याम पाटील आणि प्रमोद येवले.

## 'लाडोबा' साने गुरुजी स्मृती सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक

**मुंबई :** मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, दादर सार्वजनिक वाचनालय, काशिनाथ धुरू हॉल ट्रस्ट आणि विचारधारा प्रतिष्ठान, गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात प्रतिष्ठित असलेल्या दिवाळी अंक स्पर्धेतील विजेत्या संपादकांचा गौरव करण्यात आला. या स्पर्धेचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष असूनश त्यात 'लाडोबा' मासिकाच्या दिवाळी अंकाचा 'साने गुरुजी स्मृती मुलांचा सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक' म्हणून गौरव करण्यात आला.

मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर संजय घाडी, उद्योजक अशोक पाटील, साहाय्यक पोलीस आयुक्त संजय धुमाळ, संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, दादर सार्वजनिक वाचनालयाच्या शुभा कामथे, विकास होशिंग, देवदत्त लाड, संजीव गुप्ते, प्रशांत घाडीगावकर, रमेश सांगळे, आत्माराम गायकवाड, नितीन कदम आणि कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

सुवर्णमहोत्सवी दिवाळी अंक परंपरेचा गौरव आणि भाषिक अस्मितेची अभिव्यक्ती यावेळी अनुभवता आली. गोव्यापासून ते महाराष्ट्राच्या विविध भागातील अनेक सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकांच्या संपादकांचा यावेळी गौरव करण्यात आला.

मराठी संस्कृतीची उज्वल परंपरा नव्या पिढीपुढे दृढपणे ठेवण्याचा आमचा प्रामाणिक आहे, असे सांगत रवींद्र मालुसरे यांनी सर्व संपादकांचे यावेळी कौतुक केले.

# महाराष्ट्रकन्या

**''दादा अचानक गेले आणि जबाबदारीचं मोठं ओझं ठेवून गेले. हे सगळं शिवधनुष्य उचलत असताना सगळ्यांच्या अपेक्षांचं ओझं आणि असणारी जबाबदारीची जाणीव याची कल्पना आहे. यापुढे महाराष्ट्राचं कल्याण, जनतेचं भलं आणि राष्ट्रवादीचा विचार हेच आता माझं ध्येय असणार आहे. केवळ पार्थ आणि जय हेच माझं कुटुंब नाही, तर संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा माझा परिवार आहे,'' असे धीरोदात्त उद्गार राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्राताई पवार यांनी काढले आणि सगळेच आवाक झाले.**



**संपादकीय** — घनश्याम पाटील ७०५७२९२०९२

पतीच्या अपघाती निधनानंतर चौथ्या दिवशी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणाऱ्या सुनेत्राताईंच्या खंबीरतेचे दर्शन त्याचवेळी घडले होते. पतीवियोगात हतबल होऊन सगळ्या जबाबदाऱ्यांपासून दूर पळायला त्या लेच्यापेच्या नेत्या नाहीत. लहानपणापासूनच त्यांना राजकारणाचं बाळकडू लाभलंय. मराठवाड्यातील धाराशिवच्या तेर या गावचे 'डॅशिंग' नेते डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या त्या भगिनी आहेत. एकेकाळी शरद पवारांच्या सोबत सावलीप्रमाणे असलेल्या पद्मसिंहांची धावपळ त्यांनी बघितली आहे. लग्नानंतर पवारांसारख्या बलाढ्य राजकीय घराण्याची सून म्हणून आल्यानंतर त्यांनी पडद्याआड राहत अनेक भूमिका पार पाडल्या आहेत. अजितदादा पवार यांच्यासारख्या झंजावाताची सावली बनून राहतानाच त्यांनी काटेवाडी गावच्या विकासात मोलाचे योगदान दिले. पर्यावरणविषयक अनेक कामे आस्थेने पूर्ण केली.

अजितदादांचं अपघाती निधन हा संपूर्ण महाराष्ट्राला धक्का होता. त्या दुःखातून महाराष्ट्र अजूनही सावरला नाही. त्यांच्याशी कसलाच परिचय नसणाऱ्यांच्या डोळ्यातही अश्रूंचे बांध फुटले. मोठ्या झाडाखाली छोटा वृक्ष वाढत नाही, हा निसर्गनियम असतो; मात्र शरद पवार यांच्यासारख्या उचापती नेत्यांसोबत काम करूनही त्यांनी स्वतःला वेळोवेळी सिद्ध केलं. शरद पवार यांनी फक्त इशारा केला तरी त्यांचा आदर राखत त्यांनी त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतले. 'आपला काका लई मोठा हाय' हे सांगताना त्यांना कायम अभिमानच वाटायचा. दुसरीकडे शरद पवार यांनी मात्र आपल्या या कर्तबगार पुतण्याला कधीच कोणत्या महत्त्वाच्या संधी दिल्या नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जास्त आमदार आलेले असताना आणि दादांना मुख्यमंत्री पदाची संधी असतानाही त्यांनी दादांना सर्वोच्च सत्तेपासून दूर ठेवले आणि इतर चार खाती मागून घेतली.

'मी राजकारणातला टग्या आहे' किंवा 'धरणात पाणीच नाही तर आता काय त्यात मुतू का?' अशी काही चुकीची वाक्ये दादांच्या तोंडून गेली. त्यावेळी त्यांना समजून घेत लोकांचे गैरसमज दूर करण्याऐवजी दादांविषयी जनमत कसे कलुषित होईल हेच बघितले गेले. दादांनाही त्याची जाणीव झाली आणि लगबगीने त्यांनी कराडला जाऊन यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीपुढे नतमस्तक होत 'आत्मक्लेष' केला. लोकांना काय वाटायचे ते वाटू द्यात पण आपल्याकडून चूक झालीच तर ती सुधारायची आणि स्वतःत बदल करायचे हा सध्याच्या राजकारणातील दुर्मीळ गुण दादांत होता.

अशा सगळ्या परिस्थितीत त्यांच्या सोबत ठामपणे राहिलेल्या सुनेत्राताईंनी त्यांना धीर दिला होता. 'लोक ट्रोल करतात त्याचे आम्हाला वाईट वाटते, शेवटी आम्हीही माणसेच आहोत ना?' असं त्यावेळी त्या म्हणाल्या होत्या.

दादा अचानकपणे गेल्याने दुःखाचा डोंगर कोसळला होता. शरद पवार यांचे आजवरचे राजकारण पाहता आमदारांची फोडाफोडी होणार, अशी चर्चा होती. दोन्ही पक्ष एकत्र आणायचे असा मनसुबा बोलून दाखवला जात होता. किंबहुना दादांचीच ती कशी इच्छा होती, असे सांगणारे महाभागही पुढे आले. हे सगळे पाहता दादांचे कर्तृत्व पुसले जाऊ नये म्हणून अफाट क्षमतेचे 'जादूई मुख्यमंत्री' देवेंद्रजी फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत त्यांनी लगोलग उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याची तयारी दर्शविली. स्वतःला चाणक्य समजणारे अनेक स्वघोषित धुरंधर त्यामुळे बाजूला पडले आणि एक नवे पर्व सुरू झाले.

सुनेत्राताईंचे नवे पर्व आहे, हेही रोहित पवार यांच्यासारखे नेते मानायला तयार नाहीत. उलट 'काकींच्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला आणि ते पाहताना आम्हालाच वाईट वाटले,' असे निर्लज्ज विधान करत त्यांनी त्यांची तोकडी समज दाखवून दिली. आजवर भारताच्या राजकारणात विविध विचारधारांच्या मोजक्या महिला पक्षाध्यक्ष झाल्या. त्या रांगेत सुनेत्रावहिनी जाऊन बसल्या आहेत. ही महाराष्ट्रकन्या या सगळ्यांजणीपेक्षा अफाट कर्तृत्व गाजवेल हे वेगळे सांगायला नको. एका अत्यंत वाईट प्रकारामुळे त्यांना या सगळ्यात सामील व्हावे लागले आहे; मात्र अजितदादांचा विचार पुढे नेण्यासाठी, त्यांचे कार्य चिरंतन ठेवण्यासाठी त्या या सगळे हलाहल निश्चितपणे पचवतील.

महाराणी ताराबाई यांना बाहेरच्या आणि घरच्या दोन्ही आघाड्यांवर जसा संघर्ष करावा लागला तशीच परिस्थिती सध्या सुनेत्राताईंसमोर आहे. त्यासाठी त्यांनी स्वतःला सिद्ध केले आहे. 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' असं उन्मत्तपणे विचारणाऱ्या सुप्रिया सुळेंना पुढे फडणवीसांनी काय करून दाखवलं ते दिसून आलंच. आता 'ही एकटी बाई काय करणार?' असा सूर काही जण लावत आहेत आणि तसे जनमत तयार करत आहेत.

'ज्याचं जळतं त्यालाच कळतं' हा नियम मान्य केला तर सुनेत्राताईंनी जे गमावलं आहे ते कशानेही भरून येणार नाही. तरीही त्या कणखरपणे उभ्या राहत आहेत, ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. म्हणूनच त्वेषाने पेटलेली आणि सकारात्मक दृष्टिकोन असलेली ही 'महाराष्ट्रकन्या' चिल्लर-थिल्लरांना न जुमानता आपला वेगळा राजमार्ग तयार करेल. लेखाच्या प्रारंभी दिलेल्या त्यांच्या भाषणातील ओळी याची साक्ष पटवून देतात. अजितदादांच्या निधनाला एक महिना पूर्ण झाला आहे. या दरम्यान सुनेत्राताईंच्या क्षमताचा अंदाज महाराष्ट्राला आलाच आहे. या रणरागिणीस आमच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

■■

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# शिवगर्जना : दोन पिढ्यांचा सेतू



भरत
विठ्ठल पाटील
नाशिक
९६६५९११६५७

**मज आवडते मनापासूनी शाळा**

शाळा म्हणजे फक्त वर्गखोली, फळा आणि पाठ्यपुस्तकं नव्हेत; शाळा म्हणजे संस्कारांची पेरणी करणारी भूमी. कधी नकळत घडणारे प्रसंग मनाला स्पर्शून जातात आणि शिक्षक म्हणून आपली जबाबदारी अधिक जाणवून देतात.

आस्ते कदम..

आस्ते कदम...

यश पाठांतर केलेली शिवगर्जना म्हणत होता नि योगायोगाने शाळेच्या मागील बाजूने त्याची आजी घरी जात होती. आपला नातवाचा आवाज ऐकून आजीची पावले आवाजाच्या दिशेने पडली. आजी नातवाचे बोल ऐकत होती. तो छत्रपतींना मानवंदना देत होता. कॅमेरा चालू असल्यानं मला काही बोलता येईना; पण आजीच्या चेहऱ्यावर नातवाच्या प्रत्येक शब्दागणिक आपल्या राजाविषयीचं प्रेम खुलत होतं. ती आपल्या देहबोलीतून व्यक्त होत होती हे जाणवत होतं.

छत्रपती शिवाजी महाराज हे नाव उच्चारलं की डोळ्यांसमोर उभा राहतो तो स्वराज्याचा ध्यास घेतलेला, अन्यायाविरुद्ध उभा ठाकलेला, रयतेचा खरा राजा. जनमानसात महाराजांची प्रतिमा केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाची नाही; ती आत्मसन्मानाची, धैर्याची आणि स्वाभिमानाची आहे. घराघरात त्यांच्या गोष्टी सांगितल्या जातात, अंगाईगीतात त्यांची शौर्यकथा झिरपत राहते आणि प्रत्येक पिढीच्या मनात 'आपले राजे' अशी जिव्हाळ्याची भावना रुजते. कदाचित म्हणूनच आजीच्या डोळ्यात त्या क्षणी नव्या उर्मीची चमक होती.

नातू जेव्हा शेवटाला येतो तेव्हा आजीचे दोन्ही हात आपसूक वर जातात नि... ''छत्रपती शिवाजी महाराज की जय!'' हा जयघोष आजींनी अक्षरशः काळजातून काढला होता. दोन्ही हात वर जाऊन तिच्याकडूनही महाराजांना मानवंदना दिली जात होती. तो फक्त उच्चार नव्हता; तो परंपरेचा, अभिमानाचा आणि संस्कारांचा निनाद होता. या क्षणाचा साक्षीदार माझ्यासकट वर्गातील मुलं होती.

शिवगर्जना पूर्ण झाल्यावर आजींनी यशला खिडकीत बोलावत मस्तपैकी पप्पी घेतली. त्या क्षणी आजीच्या चेहऱ्यावर अपार प्रेम ओसंडून वाहत होतं. मी विचारलं, ''आजी, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उद्या. यशनं म्हटलेलं आवडलं का?''

आजी क्षणाचाही विलंब न करता म्हणाली, ''मंग न, काहून नाही आवडणार? राजे आपले होते. तो माणूसच खास होता. बरं झालं मी इकडं आली. हे गाणं ऐकता आलं.''

यश हळूच आजीकडे पाहत म्हणाला, ''आजी, मी बरोबर म्हटलं ना?''

आजी हसत म्हणाली, ''अगदी मनापासून म्हटलंस. आवाजात जोश होता. असंच म्हणत जा. राजांची गोष्ट ऐकून मोठा हो.''

मीही त्याला विचारलं, ''यश, तुला शिवाजी महाराज का आवडतात?''

तो म्हणाला, ''सर, ते धाडसी होते. त्यांनी किल्ले जिंकले. आईसाठी, स्वराज्यासाठी लढले.''

आजी लगेच म्हणाली, ''होय रे! आणि रयतेसाठी जगले. राजा असा असावा. आयकेल हाय मी पण त्यांच्याविषयी...!''

त्या काही शब्दांत आजीचं संपूर्ण शिवप्रेम दडलेलं होतं. इतक्या वयातही तिच्या मनातला अभिमान ताजा होता.

खरं तर शाळेत साजरी होणारी शिवजयंती हा केवळ एक कार्यक्रम नसतो. ती विद्यार्थ्यांच्या मनात इतिहास जागवणारी आणि मूल्यांची पेरणी करणारी पर्वणी असते. भाषणं, पोवाडे, शिवगर्जना, वेशभूषा यामधून मुलांना आत्मविश्वास लाभतो. 'राजे कसे होते?' हा प्रश्न विचारताना धैर्य, शिस्त, न्याय आणि स्वाभिमान या गुणांची ओळख त्यांना होते. शाळा त्या दिवशी संस्कारांची भूमी बनते.

दुसऱ्या दिवशी शिवजयंती होती पण आज घडलेला हा छोटासा प्रसंग खऱ्या अर्थाने प्रेरणा देऊन गेला. यशची शिवगर्जना आणि आजीचा जयघोष या दोन पिढ्यांना जोडणारा तो क्षण म्हणजेच शिवजयंतीचा जिवंत उत्सव होता.

'शिवगर्जना' ही केवळ घोषणा नाही; ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची जिवंत साक्ष आहे. अन्यायाविरुद्ध उभं राहण्याचं धैर्य, संकटातही न डगमगणारा आत्मविश्वास, स्वराज्याची दूरदृष्टी, संघटनशक्ती आणि स्त्रीसन्मानाची मूल्यव्यवस्था हे सारे गुण शिवगर्जनेतून प्रत्ययास येतात. ही गर्जना आपल्याला शिकवते की शौर्य म्हणजे केवळ तलवार उगारणे नव्हे तर योग्यतेसाठी ठामपणे उभे राहणे होय. सांस्कृतिक अभिमान जपत, सर्वांना सोबत घेऊन न्याय्य समाज उभारण्याची प्रेरणा शिवगर्जना देते. म्हणूनच, ती प्रत्येक पिढीला जागृत करणारी आणि उत्तम नागरिकत्वाकडे नेणारी प्रेरणागर्जना आहे. म्हणूनच ती मुलांकडून पाठ करून घेणे आवश्यक वाटले.

शिक्षक म्हणून अशा क्षणात मला नेहमी जाणवतं, आपण शिकवतो ते केवळ पाठ नसतात; आपण पेरतो ते संस्कार असतात. एका छोट्याशा शिवगर्जनेनं दोन पिढ्या जोडल्या जातात, इतिहास वर्तमानात येतो आणि अभिमान डोळ्यात दाटतो. वर्गात उच्चारलेले शब्द कधी घराघरात घुमतात तर कधी आजीच्या हृदयातून जयघोष बनून बाहेर पडतात.

अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ ऐतिहासिक ज्ञान वाढत नाही तर व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळते. पाठांतर करताना स्मरणशक्ती बळकट होते, सादरीकरणातून आत्मविश्वास वाढतो आणि सार्वजनिक बोलण्याची भीती कमी होते. शिवगर्जनेसारख्या कृतींमधून मुलांना मूल्यशिक्षण प्रत्यक्ष अनुभवातून समजते. इतिहास केवळ पुस्तकात न राहता त्यांच्या भावविश्वात प्रवेश करतो. कुटुंब आणि शाळा यांच्यातील दुवा अधिक दृढ होतो. शिक्षणाची हीच तर खरी फलश्रुती आहे, ज्ञानासोबत संस्कारांची जोपासना करणे. अशा क्षणांसाठीच तर आपण शिक्षक आहोत आणि म्हणूनच मन पुन्हा एकदा म्हणतं, शिवगर्जना ही दोन पिढ्यांचा सेतू अबाधित ठेवणारी ऊर्जादायी उज्ज्वल परंपरा आहे...!

शिवराय मनामनात, शिवजयंती घराघरात..!

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबरधे**
**ता. मालेगाव, जि. नाशिक**

# मुलगी जन्माला येण्याची भीती



मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त
लेखक
९०९६२१०६६९

**लघुकथा**

गावाच्या कडेला असलेल्या त्या छोट्याशा घरात शांतता होती पण ती सुखाची नव्हती तर भीतीची होती. सीमा सातव्या महिन्यात होती. तिच्या पोटातलं बाळ हललं की तिच्या चेहऱ्यावर क्षणभर हसू उमटायचं पण लगेच ते काळजीच्या सावलीत हरवून जायचं! कारण तिच्या मनात एकच प्रश्न सतत फिरत होता, जर मुलगी झाली तर? तिला मुलगी नको होती असं नव्हतं. उलट, तिला लहानपणापासूनच बाहुल्यांशी खेळताना स्वतःची मुलगी हवी असं वाटायचं. आता परिस्थिती वेगळी होती. सासू रोज देवासमोर दिवा लावताना एकच मागणं करायची, ''देवा, यावेळी नातूच दे.''

घरात आधीच दोन मुली होत्या. त्या गोड, निरागस, घरभर हसू पसरवणाऱ्या! पण समाजाच्या नजरेत त्या जणू ओझंच होत्या. शेजारच्या काकूंचे टोमणे, नातेवाईकांचे कुजबुजणे आणि नवऱ्याच्या चेहऱ्यावर दिसणारी न बोललेली अपेक्षा हे सगळं सीमाला रोज जाणवत होतं.

एकदा रात्री ती नवऱ्याशी हळूच बोलली, ''आपल्याला मुलगी झाली तर चालेल ना?''

तो काही बोलला नाही. फक्त दुसऱ्या बाजूला वळून झोपल्यासारखा झाला. त्या शांततेने सीमाचं मन आणखी घाबरलं. तिच्या मनात विचारांचं वादळ सुरू होतं. मुलगी झाली तर तिचं शिक्षण? लग्न? हुंडा? तिचं सुरक्षित आयुष्य? समाजाच्या प्रश्नांना तोंड देण्याची ताकद आपल्यात आहे का? एके दिवशी तिची मोठी मुलगी तिच्या मांडीवर येऊन बसली आणि म्हणाली, ''आई, मला एक बहीण हवी आहे. आपण दोघी तिची काळजी घेऊ.'' त्या निरागस शब्दांनी सीमाच्या डोळ्यात पाणी आलं. तिला जाणवलं भीती मुलीच्या जन्माची नव्हती; भीती होती समाजाच्या विचारांची! त्या रात्री तिने पहिल्यांदाच देवाजवळ वेगळी प्रार्थना केली. 'मला मुलगा किंवा मुलगी नको. मला फक्त धैर्य दे. जे येईल त्याला स्वीकारण्याचं.'

पोटातलं बाळ पुन्हा हललं. यावेळी सीमाने पोटावर हात ठेवला आणि हसली; कारण तिला जाणवलं जन्माला येणाऱ्या जीवाला भीती नसते, भीती आपण तयार करतो. त्या रात्रीनंतर सीमाच्या मनात काहीतरी बदललं होतं. भीती अजून पूर्णपणे गेली नव्हती पण तिच्या जागी एक शांत निर्धार उगवायला लागला होता. दिवस पुढे सरकत गेले. घरात पूर्वीसारखंच वातावरण होतं. सासूच्या अपेक्षा, शेजाऱ्यांच्या चर्चा आणि नवऱ्याची शांतता! पण सीमा आता त्या सगळ्यांकडे वेगळ्या नजरेने पाहू लागली होती. एके दिवशी दवाखान्यात तपासणीसाठी गेल्यावर डॉक्टरांनी हसत सांगितलं, ''काळजी करू नका. आई स्वस्थ असेल तर बाळही स्वस्थ असतं.''

त्या साध्या वाक्याने सीमाच्या मनाला धीर मिळाला. घरी परतल्यावर तिच्या लहान मुलींनी तिच्याभोवती फेर धरला. ''आई, बाळ कधी येणार? आपण त्याचं नाव काय ठेवणार?'' त्यांच्या डोळ्यांत उत्सुकता होती, भीती नव्हती. सीमा विचारात पडली या छोट्या जिवांना अजून समाजाची भीती शिकवली गेली नव्हती. त्यांच्या जगात मुलगा-मुलगी असा फरक नव्हता. फक्त आपलं बाळ होतं. महिने पूर्ण झाले आणि तो दिवस उजाडला. वेदनेच्या लाटांमध्ये तिला फक्त एकच विचार होता. जे येईल, त्याचं स्वागत करायचं. काही तासांनी बाळाच्या रडण्याचा आवाज दवाखान्यात घुमला. नर्सने हसत सांगितलं, ''अभिनंदन! मुलगी झाली आहे.''

क्षणभर सगळं थांबल्यासारखं वाटलं. सीमाच्या डोळ्यात पाणी आलं पण ते दुःखाचं नव्हतं, ते दिलाश्याचं होतं. तिने बाळाला हातात घेतलं. ती अगदी नाजूक, उबदार आणि शांत होती. बाहेर सासूच्या चेहऱ्यावर निराशा उमटली, नवरा गप्प उभा राहिला पण जेव्हा त्याने त्या छोट्याशा चेहऱ्याकडे पाहिलं, त्याच्या डोळ्यांतलं कडकपणं हळूहळू विरघळलं. मोठ्या मुलींनी आनंदाने टाळ्या वाजवल्या, आपली बहीण आली! त्या क्षणी सीमाला जाणवलं भीती संपली नव्हती पण ती आता एकटी नव्हती. तीन छोट्या हातांनी तिचं जग घट्ट पकडलं होतं. त्या रात्री घरी परतल्यावर नवरा तिच्या जवळ बसला आणि हळूच म्हणाला, ''आपण तिला शिकवू! मजबूत बनवू!''

सीमा हसली! कारण तिला उमगलं होतं मुलगी जन्माला येण्याची भीती संपवण्याचं पहिलं पाऊल म्हणजे तिचं स्वागत करणं!



संदीप वाकचौरे
८३२९३२८४७०

# भाषा वाचेल तर राष्ट्र वाचेल

**जगाच्या पाठीवर प्रत्येक प्रांत आणि भाषा बोलणारी माणसं आपली भाषा जतन करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्या भाषेशी माणसांचे भावनिक नाते जोडलेले असते. त्यामुळे भाषेच्या माध्यमातून माणसे, राष्ट्र आणि तेथील संस्कृतीचे जतन होत असते. भाषा जिवंत राहिली तर संस्कृती टिकते. भाषा हे राष्ट्राचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. जेव्हा केव्हा भाषा मरते तेव्हा त्या प्रांतातील भाषा बोलणाऱ्या समाजाच्या मनातील स्वातंत्र्याची प्रेरणा देखील मरत असते. आपली भाषा जिवंत ठेवणे, भाषेत नव्या युगाची आव्हाने पेलण्याची क्षमता विकसित करणे, त्यासाठी भाषेच्या समृद्धतेची वाट चालण्यासाठी भाषेच्या उपासकांनी प्रयत्न करण्याची गरज असते.**




अहिल्यानगर येथील सकाळ पुस्तक महोत्सवात चपराक आणि लाडोबा प्रकाशनाच्या ग्रंथदालनात साप्ताहिक चपराकचे अंक काळजीपूर्वक वाचणाऱ्या विद्यार्थिनी. (छायाचित्र : दयानंद महापुरे)

आज समाजात विविध भाषा बोलल्या जात असल्या तरी भाषांच्या माध्यमातून समाज जोडला जात असतो. भाषा या एकमेकींच्या सोबतीने समृद्धतेचा प्रवास करत असतात. बहुभाषिकत्व असलेल्या प्रांतात भाषांनी छोट्या समूहाची भाषा मारण्याऐवजी एकमेकींच्या आधारे तिची वृद्धी कशी होईल, यासाठीच्या प्रयत्नांची गरज असते. असे प्रयत्न झाले तर सर्वच भाषा समृद्ध होत जातील. अनेकदा काही भाषा या छोट्या भाषांना जाणीवपूर्वक मारण्याचे काम करतात. त्यामुळे जगभरातील अनेक छोट्या छोट्या भाषा मृत पावत असल्याचे अभ्यासक सांगतात. इंग्रज वसाहती जिथे जिथे स्थापन झाल्या तेथील स्थानिक भाषा मारण्याचे काम त्यांनी केले हा जगाचा इतिहास आहे. त्याचवेळी या मृत पावणाऱ्या भाषा या छोट्या समूहाच्या भाषा आहेत. त्यामुळे त्या मेल्या तरी त्यांची चिंता नाही असे म्हणून आपण पुढे चालत राहिलो तर त्याचा परिणाम आपल्याही राजभाषेवर होतो हेही लक्षात घ्यायला हवे. बोली भाषा जिवंत राहणे याचा अर्थ त्या बोलणाऱ्या समूहाची संस्कृती जोपासणे आहे. भाषा ही केवळ भाषा कधीच नसते. तिच्या समाज, प्रांतांचे भावनिक नाते सामावलेले असते. तेथील मातीचे आणि संस्कृतीचे देखील एक नाते असते.

आपल्या भाषेचा इतिहास गौरवशाली आहे. वर्तमानात भाषिक अभिमान बाळगला जातोय. त्याचवेळी भाषिक अस्मिता टोकदार होत आहेत. त्यातून राजकीय संघर्ष सुरू राहताना माणसांमध्येही भेदाच्या भिंती उभ्या ठाकल्या जात आहेत. भाषा ही समाज जोडण्याचे काम करते. एकमेकांच्या भाषेतून जे जे म्हणून चांगले असेल ते घ्यावे. त्यातून देवाणघेवाण करीत समृद्धतेचा प्रवास सुरू राहण्याची गरज आहे. भाषेच्या विकासासाठी प्रयत्न करण्याऐवजी आणि तिच्यात काही भर टाकण्याऐवजी संघर्ष केल्याने भाषेच्या मूळ हेतूलाच बाधा पोहचतो. भाषा समृद्ध करणे हे ती भाषा बोलणाऱ्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपण भाषेमुळे एकसंघ आहोत. भाषेतून आपली संस्कृती अधोरेखित होत असते. त्यामुळे भाषेत आपण कोणकोणत्या प्रकारच्या साहित्याची भर टाकतो ते महत्त्वाचे. वर्तमानात मराठी साहित्यात भर टाकणारे वाङ्मय काही प्रमाणात प्रकाशित होत असले तरी त्यातही कोणत्या प्रकारचे आणि कोणत्या दर्जाचे साहित्य प्रकाशित होते हेही लक्षात घ्यायला हवे. मराठी साहित्यात अलीकडच्या काळात जगातील बदलाचा वेध घेणारे आणि समाजाला दिशा देणारे, चिंतन करण्यास भाग पाडणारी वैचारिक वाङ्मयीन पुस्तके फारशी प्रकाशित होत नाहीत. त्याची कारणे असली तरी जी प्रकाशित होतात त्याला किती प्रमाणात वाचक मिळतात हाही प्रश्न आहे. अशा परिस्थितीत भाषा समृद्ध कशी होणार, हा खरा प्रश्न आहे. मराठी भाषेतील पुस्तकांचे वाचन, मराठी वर्तमानपत्रांचे वाचन, मराठी माध्यमांच्या शाळा सुरू राहण्यासाठी प्रयत्न केले गेले तर मराठी भाषा वाचणार आहे. ही माध्यमे लोकसंवादाची आहेत. त्यातून भाषेचे रूप प्रकट होत असते. प्रसारमाध्यमे भाषा जिवंत ठेवत असतात. त्यामुळे त्या माध्यमातून होणारी देवाणघेवाण महत्त्वाची ठरते. आपण जेव्हा इंग्रजी भाषेचा इतिहास जाणतो तेव्हा त्या भाषेत मोठ्या प्रमाणावर असे छोटे छोटे प्रयत्न होताना दिसतात. ते लोक भाषेबाबत जितके जागृत व संवेदनशील आहेत तेवढी संवेदनशीलता आपण जोपासण्याची गरज आहे. मराठी भाषा ही आज लोकव्यवहाराची भाषा आहे. प्रशासकीयदृष्ट्या आजही मंत्रालयात मराठीचा किती उपयोग केला जातो हा खरा प्रश्न आहे. कुसुमाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे ती मंत्रालयाबाहेर भिकाऱ्यासारखी ताटकळत, प्रतीक्षा करीत आहे. हे तिचे रूप का निर्माण झाले?

वर्तमानात अद्यापही शंभर टक्के मराठीचा उपयोग शासकिय पत्रव्यवहार होत नाही. राज्यातील न्यायालयाचा कारभार मराठी होण्याची आजही गरज आहे. अनेक विद्यापीठांचा कारभारही इंग्रजीत होतो आहे. शासनाचा कारभार हा लोकांच्या भाषेत झाला तर लोकांचे प्रश्न अधिक वेगाने सुटण्यास मदत होते पण कारभाराची भाषा ही लोकभाषा न ठेवता ती इंग्रजी ठेवणे आणि त्यात लोक व प्रशासन यांच्यात जाणीवपूर्वक अंतर ठेवण्यात तत्कालीन सरकारी व्यवस्थेचा स्वार्थ होता. आज राज्यकर्ते आणि लोक हे एकाच देशाचे नागरिक आहेत. त्यामुळे लोकभाषाच प्रशासनाची भाषा होण्याची गरज आहे. तसा विचार गंभीरपणे करण्याची गरज आहे.

आपल्या भाषेत समाजातील समूहासोबत संवाद साधण्यात आपल्याला अभिमान वाटायला हवा. येथे आपल्या भाषेत संवाद साधताना आपल्यालाच लाज वाटते. बाहेरील प्रांताचे लोक येथे व्यवसाय करायला येतात. ते त्यांच्या भाषेत व्यवहार करतात. त्यांना व्यवसायाची गरज असल्याने त्यांनी येथील भाषा शिकणे महत्त्वाचे आहे. आपणच त्यांच्या भाषेत संवाद करतो त्यामुळे आपल्याच मायभूमीत आपलीच भाषा पोरकी होण्याचा धोका अधिक असतो. आपली भाषा कोणावर लादायची नाही हे जरी सत्य असले तरी आपली भाषा मरू द्यायची नाही, याचाही विचार करायला हवा. आपल्याच भाषेत व्यवहार आणि शिक्षण सुरू राहील अशी काळजी घ्यायला हवी.

मराठी भाषा संवर्धनासाठी प्रयत्न होत असताना तिच्याशी नाते सांगणाऱ्या अनेक बोली भाषा आहेत. त्या भाषा देखील जिवंत आणि समृद्ध करण्यासाठी मराठी भाषिकांनी आणि तिच्या उपासकांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. या बोलीभाषाही आपल्या भाषेसाठी महत्त्वाचा विषय आहे. तिचे जतन करणे याचा अर्थ मराठी समृद्ध करणे आहे. मुळात मुख्य भाषेच्या विकासाचा विचार करता बोली भाषा, परिसर भाषा देखील जिवंत राहण्यासाठी मुख्य भाषेच्या माध्यमातून प्रयत्न व्हायला हवेत. त्या भाषेत जितके साहित्य, संवाद होईल तितक्या मोठ्या प्रमाणावर मराठी भाषेचा विकास होण्याची शक्यता अधिक आहे.

**(लेखक शिक्षणक्षेत्राचे अभ्यासक आहे.)**




हे आहेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कापूरवाडी येथील शिक्षक. त्यांनी सकाळ पुस्तक महोत्सवानिमित्ताने गावकऱ्यांना आवाहन केले की, शाळेसाठी पुस्तकं खरेदी करायची आहेत, ज्यांना शक्य होईल त्यांनी आर्थिक सहकार्य करा. बघता बघता काही निधी गोळा झाला. त्यातून पुस्तकांसाठी एक कपाट विकत घेतलं आणि पंचवीस हजार रुपयांची (सवलतीत. मूळ रक्कम आणखी जास्त होईल) पुस्तके विकत घेतली. शिवाय शिक्षकांनीही काही निधी गोळा केला. त्यातूनही पुस्तके विकत घेतली. 'जे न करी राव, ते ते करी गाव' म्हणतात ते उगीच नाही. असे हात पुढे आले तर राज्यातील सगळ्याच शाळा ग्रंथसमृद्ध होतील.

# महोत्सवातील क्षणचित्रे

अहिल्यानगर येथे गुरुवार, दि. १९ ते २२ फेब्रवारी दरम्यान सकाळ पुस्तक महोत्सव पार पडला. त्यात चपराकच्या डॉ. कैलास दौंड लिखित आजचे शिक्षणयात्री या महत्त्वपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन झाले. विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आणि वाचनप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत चपराकच्या ग्रंथदालनातून मोठ्या प्रमाणात ग्रंथ खरेदी केली. वाचनवाढीच्या दृष्टिने सकाळने आयोजित केलेला हा महोत्सव अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.




'चपराक'ने प्रकाशित केलेल्या डॉ. कैलास दौंड लिखित 'आजचे शिक्षणयात्री' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. नितीन बानगुडे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी 'सकाळ'च्या नगर आवृत्तीचे संपादक प्रकाश पाटील, ज्येष्ठ लेखक सदानंद भणगे, प्रकाशक घनश्याम पाटील, राज्य पुरस्कार विजेते लेखक मयूर बागुल, संपत गर्जे आदी उपस्थित होते.



अहिल्यानगर येथील शासकीय बालगृहातील मुलींनी 'चपराक'च्या ग्रंथ दालनाला भेट देऊन पुस्तक खरेदी केली. 'कॅटालिस्ट फॉर सोशल ॲक्शन' या संस्थेने त्यांना ग्रंथ खरेदीसाठी आर्थिक साहाय्य केले.



विद्यार्थिनींना पुस्तकांची माहिती सांगताना 'चपराक'च्या ऑनलाईन संपादक ज्योती घनश्याम



'चपराक'चे लेखक शशिकांत शिंदे, सुजाता पुरी, डॉ. संजय बोरुडे आदींनी 'आजचे शिक्षणयात्री'चे स्वागत केले.



इतिहास संशोधक डॉ. प्रमोद बाणखेले यांनी 'चपराक'च्या ग्रंथ दालनास भेट एक दुर्मीळ शिवकालीन चित्र घनश्याम पाटील यांना भेट दिले.



उपक्रमशील शिक्षिका शीतल झरेकर (उजवीकडून चौथ्या), राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते शिक्षक नारायण मंगलाराम यांनी 'चपराक'च्या ग्रंथदालनास भेट देऊन पुस्तके खरेदी केली.




शेवगाव येथील सामाजिक कार्यकर्ते आणि शैक्षणिक संस्थांचे चालक ॲड. शिवाजीराव काकडे, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, नाटककार डॉ. सोमनाथ मुटकुळे, इम्रान शेख आदींनी 'चपराक'च्या दालनातून ग्रंथखरेदी केली.

# शांत पावलांनी सत्तेच्या उंबरठ्यावर



रमा जाधव
कोल्हापूर
८००७९९७२२३

**राजकारणात काही व्यक्ती गडगडाट घेऊन येतात तर काहींचे आगमन शांत असते पण त्याची चाहूल काळाला लागते. सुनेत्रा वहिनींचा उपमुख्यमंत्रीपदाचा प्रवास हा दुसऱ्या प्रकारातला आहे. हा प्रवास घोषणा करत नाही, तो साक्ष देतो.**

पवार कुटुंबात बाहेरून आलेली ही स्त्री, कधीच 'मी'च्या गजरात नव्हती. तरीही काळाच्या ओघात तीच अधिक स्थिर, अधिक निर्णायक, अधिक पॉवरफुल ठरली. सत्ता ही केवळ पदात नसते, ती विश्वासात असते आणि सुनेत्रा वहिनींनी तो विश्वास आयुष्यभर कमावला आहे.

शरद पवार यांची राजकीय दृष्टी आणि दीर्घ अनुभव, सुप्रिया सुळे यांची आधुनिक संवेदनशीलता आणि संवादक्षमता आणि सुनेत्रा वहिनींची न बोलता काम करणारी समाजकारणी भूमिका या तिघांची अदृश्य सांगड आज एका निर्णायक टप्प्यावर येऊन ठेपली आहे. हा केवळ व्यक्तिंचा योगायोग नाही तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक सुसंस्कृत वळण आहे.

समाजकारणात सुनेत्रा वहिनी सतत कार्यरत राहिल्या. प्रसिद्धीपासून दूर, कॅमेऱ्यांपासून अलिप्त. महिलांचे प्रश्न, कुटुंबाचे दुःख, ग्रामीण जगण्याची कळ हे त्यांचे विषय होते. भाषणांपेक्षा भेटी, आश्वासनांपेक्षा आधार आणि प्रसिद्धीपेक्षा परिणाम ही त्यांची कार्यशैली राहिली. म्हणूनच त्यांच्या कामाला आवाज नव्हता पण वजन होते. आज जेव्हा महाराष्ट्र उपमुख्यमंत्रीपदावर एक स्त्री पाहणार आहे, तेव्हा तो क्षण केवळ राज्यापुरता मर्यादित राहणार नाही. अख्खा देश पाहील, की सत्ता आरडाओरडीतच असते असे नाही. कधी ती शांतपणे येते आणि खोलवर रुजते.



सुनेत्रा वहिनींचे नेतृत्व हे नजरेआड पण निर्णायक असेल, याची जाणीव अनेकांना आतून आहे. आणि एक गोष्ट स्पष्ट सांगायला हवी. दादा गेलेले नाहीत. मित्रांनो, ते कुठेही गेलेले नाहीत.

अजित पवार ही केवळ व्यक्ती नाही, ती एक चालणारी ऊर्जा आहे. आज ती ऊर्जा अधिक संयमी झाली आहे, अधिक परिपक्व झाली आहे. सुनेत्राच्या पाठीशी उभा असलेला दादा हा सावली सारखा आहे. दिसत नाही पण उन्हापासून वाचवतो. आक्रमक राजकारणाच्या प्रवासानंतर आज तोच अनुभव सुनेत्रा वहिनींच्या शांत नेतृत्वाला बळ देतो आहे. थोडी करडी भाषा बोलायची तर हेही सत्य आहे की महाराष्ट्राचे राजकारण अजूनही पुरुषप्रधान आहे. स्त्री नेतृत्वाला संशयाने पाहिले जाते पण सुनेत्रा वहिनींना आरक्षणाची ढाल नाही, कामाचा इतिहास आहे. सहानुभूतीचा आधार नाही, विश्वासाची जमीन आहे. म्हणूनच त्यांचे उपमुख्यमंत्रीपद हे प्रयोग नाही तर परिणाम असेल. या सगळ्यात करुणा आहे कारण हा प्रवास सहज नव्हता. संघर्ष आहे कारण मौन पाळत पुढे जाणे सोपे नसते! आणि आशा आहे कारण अशी शांत सत्ता राज्याला स्थैर्य देऊ शकते. पवार कुटुंबात बाहेरून आलेली ही वहिनी आज कदाचित सर्वात आतून मजबूत उभी आहे. तिच्या शब्दांपेक्षा तिची उपस्थिती अधिक बोलकी आहे आणि म्हणूनच, सुनेत्रा वहिनींचे नेतृत्व हे केवळ एक पद नसेल

तो महाराष्ट्राच्या राजकारणातील शांत आत्मविश्वास असेल.

# स्वयंसेवकांची संघर्षमय गाथा




नागेश शेवाळकर
९४२३१३९०७१

**नुकतेच अनंत घोगलेलिखित, 'चपराक प्रकाशन' प्रकाशित 'मोहरे झरेला पडले' हे पुस्तक वाचण्यात आले. संघाविषयी उत्सुकता असणाऱ्यांनी हे पुस्तक वाचलेच पाहिजे. 'संघ चुलीपर्यंत गेला पाहिजे' हा संघस्वयंसेवकांसाठी मोठा संदेश आहे. त्या मागची संघाची भूमिका अशी की घरातील महिलांना संघाची चांगली ओळख झाली पाहिजे. त्यांच्याही अंगी घरातील संघस्वयंसेवका इतकाच संघ मुरला पाहिजे.**

निष्ठावान स्वयंसेवक कै. श्री. बाळासाहेब गोहाड या लेखात त्यांचे गुणविशेष वर्णन करून लेखक एक आठवण सांगतात. एकदा एक स्वयंसेवक एका प्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रित होते. कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर बाळासाहेबांनी आयोजकाला सुनावले, जो दैनंदिन शाखेत उपस्थित राहत नाही त्याला दैनंदिन शाखा या विषयावर बौद्धिक द्यायला बोलावता...? किती विरोधाभास आहे ना!

श्री. मोहनराव देशपांडे यांच्याबद्दल लेखक लिहितात, देशपांडे यांचे घर सर्वांसाठी सदैव खुले असे. दादा नावाने सर्वदूर परिचित असलेले देशपांडे घरी असले-नसले तरीही कार्यकर्ते कायम त्यांच्या बैठकीत असत. दादांचे घर म्हणजे जणू संघाचे कार्यालय आणि निवडणुकीच्या काळात निवडणूक कार्यालय! सौ. देशपांडे यांच्या आदरातिथ्य गुणाचा लेखक आवर्जून उल्लेख करतात. श्री. एकनाथ हरी उत्पात हे स्वयंसेवक दाही दिशांना जाऊ फिरू मेघासम तसेच भारत हिंदुस्थान है, भगवान का वरदान है! ह्या गीतांचा उत्पात नेहमी सराव




करून घेत. लेखकाच्या भेटीत उत्पात त्यांना संघाचे अनुभव, डॉ. हेडगेवार, श्री गुरुजी यांनी संघासाठी घेतलेल्या कष्टाची माहिती देत. उत्पात यांच्याबद्दल लेखक आदराने लिहितात, दवाखान्यातील बाकड्यावर बसून या श्रीकृष्णाने या अर्जुनाला (मला) संघगीता सांगून संघाचे विराट दर्शन घडवले.

अनंतरावांचा अभ्यास, निवेदन शैली पाहून श्री. ज्ञानेश्वर कणसे महाराज घोगलेंना प्रवचन करण्यासाठी प्रवृत्त करतात. कणसे महाराजही कीर्तन-प्रवचन करत. महाराजांच्या आई म्हणत, ''माझ्या मुलाचे बालपण कष्टात गेले. वडील लहानपणीच वारले. आता तो कीर्तन-प्रवचन करायला लागला की, मला ज्ञानोबा माउलीच बोलल्यासारखे वाटते.''

श्री. राजाभाऊ खळदकर यांचा एक मनोरंजक किस्सा वाचायला मिळता. एकदा संघाच्या शाखेत सूर्यनमस्काराची स्पर्धा होती. स्पर्धेत इतरही स्पर्धक होते. राजाभाऊ १,१११ सूर्यनमस्कार घालूनही थांबायला तयार नव्हते.

मार्गदर्शक व्यक्ती आपल्या शिष्याची भक्तिभावाने पूजा करते... ही घटनाच हृदयस्पर्शी आहे! सुरुवातीला घोगले यांना संघकार्यात मदत केलेली व्यक्ती मधुसूदन तथा बाळासाहेब अत्रे हे एका अर्थाने घोगले यांचे गुरू! परंतु अत्रे दर गुरुपौर्णिमेला लेखकाला घरी बोलावून घोगले यांच्या पावलांची पूजा करीत. बंडू तीसगावकर यांच्याकडे निमगाव केतकी या गावात आठवड्यातून दोन दिवस शाखा लावण्याची जबाबदारी होती. तीसगावकर लेखकाच्या घरी येऊन शाखेसाठी आवश्यक ते साहित्य घेऊन जात. शाखा झाली की पुन्हा सारे साहित्य परत करून गावी जात. त्यांची धावपळ पाहून लेखक म्हणाले, ''उशीर झाला तर साहित्य तुझ्या घरी घेऊन जा, उद्या आणून दे.''


''एकदा का सवलतीची सवय लागली की ती शिस्त बिघडवते. आपण नियमातच राहिलेले बरे,'' तीसगावकर म्हणाले. प्रसंग छोटा पण संदेश किती महान आहे! अतुल तेरखेडकर यांच्या पत्रकारितेबाबत लेखक त्यांना 'बॉर्न टिचर' किंवा 'बॉर्न लीडर' याप्रमाणे 'जन्मजात पत्रकार' अशी पदवी देतात. जागृत पत्रकार या नात्याने अतुल तेरखेडकरांचे निर्भीड वार्तांकन इत्यादी बाबींचा उल्लेख वाचनीय आहे. या पुस्तकात स्वयंसेवकांच्या कार्याची नि संघाच्या कार्यशैलीची उत्तमरित्या वाचकांना सोप्या भाषेत ओळख करून दिली आहे. पुस्तक वाचनीय आहे.

| | | |
|---|---|---|
| **मोहरे झरेला पडले** | : | व्यक्तिचित्रण |
| **लेखक** | : | अनंत घोगले |
| **प्रकाशक** | : | चपराक प्रकाशन |
| **पाने** | : | ४८ |
| **मूल्य** | : | ८० |

'चपराक'ची ग्रथसूची



विजयालक्ष्मी मणेरीकर
९८२२६८३७९९



# अधिरा

**कन्या तू सुंदरी, रम्या तू ईश्वरी**
**स्वकर्तृत्त्वाची घे धुरी, उत्तुंग तू घे भरारी**

**मुलगी झाली हो! काय करावे आता? कौमार्य सांभाळत विकास करावा की घाबरत न्यूनगंडास बळी पडावे? कळीचा जन्म झाला तर ती हळूहळू उमलू लागणार. तिचं उमलणं निसर्गत: मुक्त, बेबंद, सुगंधित, आत्मदंग असणार तसेच ते असावे यासाठी एक उत्तम माळीण तिची उत्तम निगा राखते. आपल्या घरी जन्मलेल्या मुलीबाबतही तसेच असावे, नाही का? मुलीची आई हीच मुलीची सुजाण माळीण आणि वडील म्हणजे संवेदनशील माळी बनायला हवेत. हो की नाही?**

आदर्श पालकत्व आपोआप कळायला लागतं असं नव्हे तर आदर्श सृजनशील पालक व्हायला शिकावं लागतं. निरीक्षण, वाचन, संवाद, प्रशिक्षण, समुपदेशन असे अनेक मार्ग यासाठी उपलब्ध आहेत. पालकत्व ही एक अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. नोकरीत जसे प्रमोशन होऊन वरिष्ठ श्रेणी मिळाल्यावर जबाबदारी वाढते तसे 'पालकतत्व' ही आयुष्यातील श्रेणीवाढ आहे. त्यामुळे दैनंदिन आयुष्यातील चोवीस तासांच्या दिनक्रमातील काही तास बालसंगोपणास द्यावेच लागतात. 'आई' नोकरी करणारी असो वा गृहिणी तिचा प्रेमळ सहवास जन्मापासून साधारण दहा-अकरा वयापर्यंत हा मुलींना हवाहवासा असतो. त्यानंतर शरीरात भौतिक आणि रासायनिक बदल असे काही होतात की बुद्धी आणि मनाची चक्रं एकदम बदलायला लागतात. भावनांचा आवेग इतका बदलायला लागतो की तावडीतून सारखा-सारखा सुटायला लागतो. कधीकधी आई मुलीस एकदम परकीच भासायला लागते. कधी कधी प्रतीस्पर्धी वाटायला लागते तर कधी कधी मठ्ठ, ओल्ड फॅशन्ड वाटायला लागते. श्रीदेवीचा इंग्लिश विंग्लिश चित्रपट बघितलाय का? अगदी त्यातील श्रीदेवीची मुलगी सपना कसे सतत आईच्या मनाविरुद्ध वागते, आईचा सतत अपमान करते, आईचं बिल्कुल ऐकत नाही. तर असे का होत असावे बरं? सतत आई आई करणारी मुलगी एकदम असे कसे वागायला लागते? याला म्हणतात 'इलेक्ट्रॉ कॉम्प्लेक्स'! सिगमंड फ्रायड या मानसशास्त्रज्ञाने ही संकल्पना सिद्ध केली होती. सिगमंड फ्रॉयडच्या सिद्धांतानुसार हे कॉम्प्लेक्स मुला-मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या 'फॅलिक टप्प्यात' विकसित होते. साधारण पाच-सहा वर्षापासून पुढे मुलगी जसजशी मोठी होते, वयात येते तसतसे तिला वडिलांचे जास्त आकर्षण वाटते. त्यातून आईबद्दलचे आकर्षण कमी होते. केवळ कमी होत नाही, आईचा दु:स्वास वाटायला लागतो... कारण शरीरात अशा काही संप्रेरकं हार्मोन्सची निर्मिती होत असते त्याचा परिणाम मनावर, विचार करण्यावर, भावनांवर होत असतो. अवचेतन मनात बरंच काही साठलेलं उफाळून येतं आणि त्याचा परिणाम दैनंदिन वागण्यावर होतो. याचे फार उत्तम उदाहरणांसह विश्लेषण अमेरीकन मानसशास्त्रज्ञ फ्राईड आणि कार्ल जंगच्या पुस्तकांतून वाचायला मिळते. पालकांनी वाचणे आवश्यक आहे. शालेय अभ्यासक्रमात याविषयी धडा असणे आवश्यक आहे. याविषयी बालमानसशास्त्रीय तज्ज्ञांची समुपदेशनपर व्याख्याने शाळेत आयोजित करणे आवश्यक आहे. ज्यामुळे मुला-मुलींना, पालकांना आपल्या अंतर्मनाचा शोध घेऊन वागण्यात संयमितपणा आणण्यात मदत होईल. अन्यथा अनाकलनीय, टोकाची वृत्ती सुद्धा बळावते व अघटित घटना सुद्धा आजुबाजूला कुटुंबात घडत असतात. सामाजिक, कौटुंबिक दडपणामुळे कुठेही वाच्यता न करता 'तेरी भी चूप मेरी भी चूप' असे धोरण घेतले जाते. 'इडीपस कॉम्प्लेक्स'बद्दल आपल्याकडे फार सजगता नाही. त्यामुळे मुली-मुले पौगंडावस्थेत अशी का वागतात याचे गूढ पालकांना, शिक्षकांना कळत नाही. नीट निरीक्षण केल्यास लक्षात येते, या वयात मुलींचे आईबद्दलचे वागणे हळूहळू बदलू लागते. मुली आईशी उद्धटपणे आणि वडिलांशी प्रेमळ, लाडीकपणे वागू लागतात. यातील मानसशास्त्रीय विज्ञान पालकांना माहीत नसल्यामुळे याविषयी आपल्याकडे त्या वयातील म्हणजे साधारणत: तीस ते पस्तीस वयात आलेल्या पालकांना मुलींच्या वागण्यातील बदलामागचे कारण लक्षात येत नाही आणि त्यामुळे अतिशय कठीण मानसिक अवस्थेतून दोघेही जातात. खरं तर आई ही सर्वच दृष्ट्या मुलीपेक्षा मोठी असते त्यामुळे सामंजस्याची अपेक्षा आईकडूनच जास्त असते पण आपल्या मुलीच्या वागण्याचे बदललेले स्वरूप बऱ्याच आया स्वीकारुच शकत नाहीत कारण त्यावेळी आईच्याही शरीरात अनेक हार्मोनल बदल होत असतात. त्यामुळे डॉक्टर सांगतात दोन्हीकडेही तवा तापलेला आहे, सबुरीने घ्यावे. होमिओपॅथिक औषधेही यावर गुणकारी ठरतात पण कुटुंब डॉक्टरांकडे गेले तर!

स्वत:च्याच मनाने चुकीचे अर्थ काढून मुलीला टोमणे मारणे, शारीरिक इजा करणे, जास्तीत जास्त घरकाम करायला लावणे, संवादाचे रुपांतर भांडणात होणे असे घरांघरांमध्ये कुटुंबामध्ये दिसते. मुली स्वत:च्या वाढत्या वयात होणाऱ्या शारीरिक, मानसिक बदलामुळे आधीच त्रस्त असतात आणि त्यात आईचे हे बदललेले रूप बघून, अनुभवून आणखी जास्त द्वंद्व निर्माण होते.

प्रत्येक आई आणि मुलीच्या आयुष्यात एक काळ असा येतो की आईच जन्मदात्या मुलीस स्वत:ची प्रतिस्पर्धी, सवत समजू लागते पण ती एक प्रकारची सुसुप्त अवस्था असते. ती अवस्था काही वर्षाच्या कालावधीनंतर संपते म्हणजे उत्तम मानसिक आरोग्य असणाऱ्या आई-मुलींचं नातं हे या कॉम्प्लेक्समधून साधारण २-३ वर्षांमध्ये पूर्ववत होतं आणि पुन्हा एकदा आई-मुलीचे विश्व बनते आणि मुलगी आईचे संपूर्ण जग असते पण मानसिक आरोग्य निकोप नसेल तर मात्र हा कॉम्प्लेक्स आयुष्यभरही मनात राहू शकतो. यातून अनेक मानसिक व शारीरिक समस्या उद्भवू शकतात.

राधा (वय बारा) : आई तुला नीट भाषा बोलता येत नाही, नीटनेटकं राहता येत नाही.

आई : तू मला शिकव आता कसे बोलायचे, कसे राहायचे! मोठी झालीस ना! शिंगे फुटलीत तुला. राधा : माझ्या टीचर्स बघ किती छान राहतात, छान बोलतात. तू येऊच नकोस शाळेत. एका ठरावीक वयात असा वाद-विवाद अनेक घरांमध्ये आई-मुलीमध्ये नित्य चालतो. हे जाणीवपूर्वक घडत नाही. अजाणतेपणाने भावनांवरचा ताबा निसटतो. का होते, कसे होते कळत नाही. यालाच हार्मोनल बदल म्हणतात. या बदलांमुळे अनेक मानसिक व शारीरिक समस्या उद्भवतात. त्यावर उपाययोजना उपलब्ध आहेत पण त्या उपाययोजना करून घेणाऱ्यांची संख्या समाजात एक टक्का सुद्धा नाही. त्यामुळे नात्यात प्रेमळ संबंध प्रस्थापित करण्यात अनेक अडचणी येतात. हे अमान्य केलंत तरी कटू सत्य आहे. यावर कोणीही बोलत नाहीत.

खलील जिब्रान या लेबनान लेखकाने साधारण दोनशे वर्षांपूर्वी लिहिलेली एक रुपककथा उदाहरणादाखल देते. एका स्त्रीचे लवकर लग्न झाल्यामुळे तिला झालेली मुलगी वयात येते तेव्हा ती आईच्या बरोबरीची वाटते. दोघी सुंदर, उंच, सडपातळ पण सुबत्तेमुळे जरा बाळसेदार... दोघींची आवड निवड सारखीच असते. दोघींचे एकमेकींवर फार प्रेम असते. दोघींनाही एकसारखीच झोपेत चालण्याची सवय असते. झोपेत चालण्याचा आजारच असतो तो! पण दोघींनाही तो झोपेत चालण्याचा आजार होता.एका रामप्रहरी थंडीच्या प्रात:काळी, त्या दोघीही झोपेत चालत बागेत गेल्या, फूलझाडांमधून फिरू लागल्या. असा बराच वेळ गेला आणि त्या एकमेकींसमोर आल्या. आईने मुलीचा गळा धरला अन् फाटक्या आवाजात ती म्हणाली, ''तू वैरीण इथे का आलीस? अगंऽऽ माझ्याकडे बघ, माझे सारे तारूण्य तू शोषून घेतलेस. माझा जीवनरस तू तुझ्याकडे वळवलास, माझे कौमार्य भंग करून तू कुमारीका म्हणवून सर्वत्र मिरवतेस. माझे रूप घेऊन तू मला दुय्यम केलेस. आता तुझे प्राण घेतल्याशिवाय मी तुला सोडणार नाही...''

मुलीने त्वेषाने आईचा गळा धरला. ती चित्कारली ''बरं झालं आज तू भेटलीस. आज मी तुला जीतं सोडत नाही. दुष्टे माझ्याकडे बघ. बघ मी म्हणजे तुझी प्रतिकृतीच! मला माझं अस्तित्वच नाही. मला स्वतंत्र आवड नाही, निवड नाही, विचार सुद्धा नाही. जिथं तिथं तूऽऽ तूच माझ्या अस्तित्वात जाणवतेस. आता तुझे आजार सुद्धा माझ्यात उतरतील! नाही नाही... आज मी तुला जीत्तं सोडणार नाही!'' दोघी एकमेकींचा गळा धरू लागताच पहाट होते. कोंबडा आरवतो. दिशा सजतात. दोघी दचकून जाग्या होतात. आई मुलीला कुशीत ओढत, कुरवाळत विचारते, ''बेटा इतक्या सकाळी तू बागेत काय करतेस? थंडी बांधेल ना, चल आत चल.''

मुलगी आईला बिलगत म्हणते, ''चल आई, आत चल! तुला थंडी अजिबात सोसत नाही. आधी ती शाल नीट गुंडाळून घे. मी चहा टाकते....''

■■

## 'सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग लीडर'ने
# सुचेता गावडे यांचा सन्मान



**पुणे** : पुण्यातील सुचेता गावडे यांना वूमन्स इन टेक ग्लोबल अ‍ॅवॉर्ड २०२५ मध्ये 'ग्लोड विनर' म्हणून घोषित करण्यात आले. त्यामुळे त्यांना अमेरिकेत झालेल्या एका सोहळ्यात 'सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग लीडर ऑफ द इयर' हा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते स्नमानित करण्यात आले.

गावडे या आरोग्य तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी नेत्या आहेत. त्यांनी सुरक्षित आणि आधुनिक इंनिनिअरिंग प्लॅटफॉर्म उभारण्यात तसेच त्यांच्या इतर तंत्रज्ञानांना मार्गदर्शन करण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. वूमन टेक नेटवर्क यांच्या वतीने आयोजित वूमन्स इन टेक ग्लोबल अ‍ॅवॉर्डस हे महिला, अल्पसंख्याक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकाऱ्यांचा सन्मान करणारे जगातील सर्वात मोठे आभासी पुरस्कार सोहळे मानले जातात. या स्पर्धेत १२८ देशांतील २७ विविध श्रेणींमध्ये एकूण १,७६० स्पर्धक सहभागी झाले होते. नेतृत्व, नवकल्पना आणि विविधतेसाठी उपक्रम राबविणाऱ्या महिलांचा गौरव पुरस्काराद्वारे केला जातो. याचाच एक भाग म्हणून तंत्रज्ञान क्षेत्रात बदल घडविणाऱ्या सुचेता गावडे यांना सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार स्वीकारताना गावडे म्हणाल्या की, समावेशक नेतृत्व आणि मार्गदर्शनासाठी 'सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग लिडर ऑफ द इयर' हा पुरस्कार मिळणे माझ्यासाठी अत्यंत अर्थपूर्ण आहे. तो तांत्रिक यशासोबतच मी जपलेल्या मूल्यांचा समावेश, सहानुभूती आणि समाज उन्नतीचा सन्मान करतो. तंत्रज्ञानातील प्रवास सतत शिकणे, वाढ आणि नेतृत्व यावर आधारीत राहिला आहे. माझा ठाम विश्वास आहे की सर्वसमावेशकतेने आणि उद्देशपूर्ण नेतृत्वाने इतारांना पुढे जाण्यास मदत करता येते. जेव्हा तुम्ही मजबूत इंनिनिअरिंग अंमलबजावणीला उद्देश पूर्ण नेतृत्व आणि जबाबदारीशी जोडता तेव्हा प्रभाव अधिक वेगाने वाढतो.''



# अरविंदांच्या विचारांची दिशा आवश्यक : वाकचौरे

**नाशिक, (प्रतिनिधी)** : योगी अरविंद यांच्या विचारांची दिशा घेऊन शिक्षण क्षेत्रात काम झाले असते तर समाज व राष्ट्राचे चित्र बदलले असते. आध्यात्माचा अर्थ केवळ बाह्यांगाने सुधारणा नाही तर ती आंतरिक सुधारणेची ती वाट आहे. योगी अरविंद यांनी शिक्षणाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना पुस्तकी न शिकवता विचार करण्यास शिकवा, त्याच्या अभिरूचीने प्रवास करू द्या, असे सांगितले आहे असे मत राज्य अभ्यासक्रम व पुनर्रचना समितीचे सदस्य संदीप वाकचौरे यांनी व्यक्त केले.

नाशिक येथील बेंजॉन देसाई फाऊंडेशनच्या वतीने चालवल्या जाणाऱ्या अनुभूती प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या वितरण संभारभात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून संदीप विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संदीप सिन्हा होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सारंग इंगळे होते. व्यासपीठावर संयोजक मनोज टीबरेवाल, अश्विनकुमार भारद्वाज उपस्थित होते. वाकचौरे म्हणाले, जीवनात शिक्षक व्हायचे असेल तर केवळ पदव्या हाती असून फारसा उपयोग नाही. त्याकरिता जीवनानुभूतीची नितांत गरज आहे. अनुभूती म्हणजे उद्याचे विश्व समृद्ध करण्याची वाट आहे. आज विद्यार्थ्यांवर आपण शिकणे लादत आहोत. हे लादणे म्हणजे माणूस होण्याच्या प्रक्रियेपासून दूर घेऊन जाणे आहे. त्या काळात त्यांनी मातृभाषेतील शिक्षणाचा विचार प्रतिपादन केला होता. आजच्या बिघडलेल्या परिस्थितीत आपल्याला खरोखर शिक्षणाचा उत्तम मार्ग सापडला तर विद्यार्थ्यांच्या आयुष्यात निश्चित बदल झालेला आपणास अनुभवता येईल.

शिक्षण हे केवळ माहितीसाठी नसते तर त्यातून स्वतःच्या उन्नतीचा मार्ग अनुभवायचा असतो. आज शिक्षणाने माणसं शहाणी व्हायला हवीत पण ती अधिक हुशार झाली आहेत. त्या हुशारीने तत्त्वज्ञान, विचारधारेची मोडतोड केली जाते. त्यामुळे आपण सत्त्वहीनतेचा प्रवास करत आहोत. शिक्षणातून आपल्याला माणूस घडवण्यात अपयश आले आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत विद्यार्थी स्वतःच शिकत असतो. त्याला शिक्षक मार्गदर्शन करत असतो. त्यामुळे शिक्षकांनी क्षमता, अभिरूची, कल याचा विचार करून मार्गक्रमण करण्याची गरज आहे. शिक्षकांना स्वतः शिकावे वाटते आहे ही गोष्ट अधिक महत्त्वाची आहे. त्यामुळे ही माणसं उद्याच्या समृद्ध समाजाच्या विकासासाठी अधिक महत्त्वाची भूमिका बजावतील असा विश्वासही वाकचौरे यांनी व्यक्त केला. यावेळी सिन्हा आपल्या भाषणात म्हणाले, आपल्या अनुभवाची मांडणी शिक्षणात अपेक्षित आहे. अनुभवसंपन्नता हेच खरे शिक्षण आहे. शिक्षण जितके अनुभवाशी जोडले जाईल तितके ते अर्थपूर्ण होण्यास मदत होईल. त्यामुळे जीवनात आपली प्रेरणास्थाने निश्चित करून ध्येयाच्या मार्गाने प्रवास केला की, ते निश्चित साध्य करता येते. ही साध्यता आपल्याला शिक्षक होण्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे. शिक्षक होण्यासाठी कोणत्याही पदवीची गरज असेल पण त्यापेक्षा अनुभवसंपन्न शिक्षणाचा विचार अधिक महत्त्वाचा आहे हे लक्षात घ्यायला हवे. प्रास्ताविक आणि अभ्यासक्रमामागील भूमिका मनोज टीबरेवाला यांनी स्पष्ट केली. यावेळी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवाची मांडणी करणारी मनोगते व्यक्त केली. भारद्वाज यांनी आढावा घेतला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

# 'काव्यवारी'च्या काव्यसंमेलनात ३५ कवींचे हृदयस्पर्शी सादकरीकरण

**पुणे** : मराठी भाषा गौरवदिनाच्या पार्श्वभूमीवर 'काव्यवारी'तर्फे चारोळी प्रदर्शन आणि मराठी काव्यसंमेलनाचे आयोजन केले होते. यावेळी ३५ हून अधिक कवींनी हृदयाला भिडणाऱ्या, सामाजिक विषमतेवर बोट ठेवणाऱ्या कवितांचे सादरीकरण केले. त्यास साहित्यरसिकांची उत्स्फूर्त दाद लाभली.

बाजीराव रस्त्यावरील हिंदूहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालनात मोठ्या उत्साहात काव्यसंमेलन पार पडले. यावेळी बावधन मार्केट यार्डचे मुख्य संचालक गोरख दगडे पाटील, गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नाव कोरलेले उदय जगताप यांच्या हस्ते ४२ चारोळ्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

काव्यसंमेलनाचे उद्घाटन विश्वास वसेकर यांच्या हस्ते करण्यात आले. काव्यवारीचे अध्यक्ष राजेश सुतार, कवी दत्तात्रेय तरलगट्टी, उपाध्यक्षा मुक्ता कोरपे, भरतकुमार लाड यांच्या



हस्ते सरस्वती पूजन तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमात बारामतीहून आलेल्या कवयित्री अनिता तांबे यांच्या हस्ते गोरख दगडे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सहभागी कवींना यावेळी सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच चारोळी पोस्टर देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाला सोनेरी छटा उलगडणारे दगडे पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. काव्यसंमेलनात पुणे, मुंबई, ठाणे, कोल्हापूर, सांगली, अकोला, गोंदिया, नागपूर, परभणी, बीड, लातूर अशा विविध जिल्ह्यांतून आलेल्या ३५ मान्यवर व नवोदित कवी तसेच कवयित्रींनी कवितांचे सादरीकरण केले. कवी बाळा रेणोसे, कवयित्री वृषाली मोरे, दिव्या लोंढे यांनी मनोगत व्यक्त केले.

काव्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत ठाणेकर, सुविद्या करमरकर, सत्यराज यादव, नितीन भोसले, भरतकुमार लाड, जुई सुतार, चैत्रा सुतार आणि शार्दुल ठाणेकर यांनी मोलाचे योगदान दिले. मिरजहून आलेले कवी प्रा. रमेश कट्टीमणी यांनी संमेलनाचे सूत्रसंचालन तसेच कवितांचे परीक्षण केले तर युट्यूबर सुरेखा भागवत यांनी निवेदन केले.

## मोलाचे आर्थिक पाठबळ

**पुण्यातील नामांकित कंपनी डायमंड बी. पी. आणि मलाबार गोल्ड ज्वेलर्स यांनी प्रायोजकत्व स्वीकारून काव्यसंमेलन यशस्वी करण्यासाठी मोलाचे आर्थिक पाठबळ दिले. त्यांच्या प्रतिनिधींनाही काव्यसंमेलनात स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मलाबारे वतीने लकी ड्रॉ काढून उपस्थित कवींची मने जिंकली.**